आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ जून २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारचा उद्या संध्याकाळी शपथविधी
- लोकसभेतलं विरोधी पक्षनेतेपद राहुल गांधी यांना देण्याचा काँग्रेस कार्यकारिणीचा ठराव
- देवेंद्र फडनवीस यांच्या उपमुख्यमंत्रीपद सोडण्याच्या प्रस्तावावर सध्या परिस्थिती जैसे-थे ठेवण्याचे भाजपाच्या केंद्रीय नेतृत्त्वाचे आदेश
- दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीनं आर्थिक मदत देण्यासाठी काँग्रेसचं राज्यपालांना साकडं

  **आणि**

- सिंधुदुर्ग, पुण्यात जोरदार पाऊस, सिंधुदुर्गसाठी उद्या रेड अलर्ट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या नवीन सरकारचा शपथविधी समारंभ उद्या म्हणजे रविवारी संध्याकाळी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संध्याकाळी सव्वासात वाजता नरेंद्र मोदी आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील.

भारताचे शेजारी देश आणि इतर मित्रदेशांचे प्रमुख या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

आकाशवाणीवर संध्याकाळी पावणे ७ वाजल्यापासून या कार्यक्रमाचं वार्तांकन सुरू होईल. त्यामुळं संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र संध्याकाळी साडे ६ वाजता प्रसारित केलं जाईल. **<><><><><>**

खासदार राहुल गांधी यांनी अठराव्या लोकसभेत विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी स्वीकारावी, असा ठराव काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने आज केला आहे. नवी दिल्ली इथं काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक झाल्यानंतर काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात विरोधी पक्ष समर्थपणे काम करेल, असा काँग्रेसला विश्वास असल्याचं वेणुगोपाल म्हणाले. तर लोकसभा निवडणुकीचे निकाल काँग्रेससाठी नवसंजिवनी ठरल्याचं जयराम रमेश यांनी सांगितलं.

दरम्यान, या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पक्षाच्या नवनिर्वाचित खासदारांचं अभिनंदन केलं. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला लोकांकडून देशभरात भरभरून प्रतिसाद मिळाला. यापुढे इंडिया आघाडीतल्या मित्रपक्षांसोबत मिळून संसद आणि संसदेच्या बाहेर एकत्र काम करू, असंही खर्गे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळात शिवसेना पक्षाला मिळणारं मंत्रिपद डॉ. श्रीकांत शिंदे यांना देण्यात यावं, अशी शिवसेनेचे नेते आणि कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचं पक्षाचे नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांनी म्हटलं आहे. कार्यकर्त्यांच्या या भावना आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडणार असल्याचं त्यांनी नवी दिल्ली इथं आज आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं.

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ९ पैकी ६ खासदार शिवसेनेच्या संपर्कात असल्याचा दावा म्हस्के यांनी केला. मात्र त्यांच्या पक्ष प्रवेशाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे निर्णय घेतील, असं ते म्हणाले.

दरम्यान, मंत्री होण्यात रस नसून पक्ष संघटनेसाठी काम करण्याची इच्छा श्रीकांत शिंदे यांनी आज व्यक्त केली. शिवसेनेत कुणाला मंत्रिपद मिळणार याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील. गुणवत्ता आणि अनुभवानुसार मंत्रिपद मिळेल असंही शिंदे यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

इंडिया आघाडीला संसदेत बहुजनांचं नेतृत्वच नको होतं केवळ बहुजनांची मतं हवी होती असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. या निवडणूक प्रक्रियेत, बहुजनांनी स्वत:चं स्वतंत्र राजकीय नेतृत्व संसदेत उभं करण्याची संधी गमावली आहे, अशा शब्दात त्यांनी टीका केली आहे.

पदाचा राजीनामा न देता राज्यातली परिस्थिती जैसे थे ठेवण्याचे भाजपाच्या पक्षश्रेष्ठींचे आदेश असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत सांगितलं. भाजपाच्या राज्य विधिमंडळ पक्षाची बैठक मुंबईत दादर मध्ये झाली, त्यावेळी ते बोलत होते.

**होल्ड-- बाईट -- (देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री)**

जनतेनं रालोआवर विश्वास दाखवला आणि नरेंद्र मोदी यांना समर्थन दिलं, या यशात महाराष्ट्राचा वाटा कमी आहे याची सल असली तरी या अपयशाची जबाबदारी घेऊन पुनरावलोकन करून विधानसभा निवडणुकीसाठी नव्या ताकदीनं पुढे जाण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. विरोधकांनी संविधानाबाबत केलेला खोटा प्रचार खोडून काढण्यात भाजपा कमी पडला, तर काही ठिकाणी समन्वयाचा अभाव आढळला, असं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्र्यांनी नेहमीच संविधानाला पूज्य मानलं असून देशात येत्या वर्षभर संविधान महोत्सव साजरा होणार आहे, असं ते म्हणाले. विशिष्ट समाजाच्या मतांमुळे माविआचे उमेदवार निवडून आले. मराठी माणसांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला मतं दिली नाहीत, जनतेची दिशाभूल करणाऱ्या आणि मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना मतं मिळाली, असं फडणवीस यांनी सांगितलं. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीत या सर्व त्रुटींवर मात करण्यासाठी एकजुटीनं काम करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

राज्यात दुष्काळाचे चटके सोसणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी राज्यपालांनी पुढाकार घ्यावा आणि राज्य शासनाला आवश्यक ते निर्देश द्यावे अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रुपये, बागायती शेतीला एकरी ५० हजार रुपये तसंच फळबागांना एकरी १ लाख रुपये मदत तातडीने द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्या, इत्यादी मागण्या विरोधी पक्षांनी केल्या असून राज्य सरकार त्याकडे लक्ष देत नसल्याची तक्रार पटोले यांनी राज्यपाल रमेश बैस यांना लिहीलेल्या पत्रात केली आहे. प्रदेश काँग्रेसने मुंबईत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे.

लोणेरे इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या परीक्षा आणि निकालात अनियमितता झाल्याच्या तक्रारींची एसआयटी मार्फत चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केल्याचंही पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात नवनिर्वाचित सरकारने मागासलेपणाच्या निकषावर मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याचं कबूल केलं आहे, त्या धर्तीवर महाराष्ट्रातही मागासलेपणाच्या निकषावर मराठा, मुस्लिम आणि धनगर समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष नसीम खान यांनी केली आहे.

**<><><><><>**

पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठीची राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा , नीट २०२४ संपूर्ण पारदर्शकपणे घेतली असून परीक्षेचं पावित्र्य कायम राखण्यात देशभरात कुठेही तडजोड केली गेलेली नाही, असा निर्वाळा राष्ट्रीय चाचणी संस्था, एनटीएचे महासंचालक सुबोध कुमार सिंह यांनी दिला आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. या परीक्षेदरम्यान कुठेही पेपर फुटण्याचा प्रकार झालेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. देशभरात ४ हजार ७५० केंद्रांवर परीक्षा झाली, त्यापैकी ६ केंद्रांवर चुकीची प्रश्नपत्रिका वितरित झाल्याची आणि त्यामुळे तिथल्या एकूण सोळाशे विद्यार्थ्यांचा वेळ वाया गेल्याची तक्रार प्राप्त झाली असून त्याची चौकशी करण्यासाठी उच्च स्तरीय समिती स्थापन केल्याचं ते म्हणाले. ही परीक्षा या वर्षी ५ मे रोजी झाली होती आणि तिचा निकाल ४ जून ला घोषित झाला<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटीत आजपासून आमरण उपोषण पुन्हा सुरू केलं आहे. या उपोषणासंदर्भात आंतरवाली सराटी इथल्या ग्रामपंचायत कार्यालयात ठराव घेण्यात आला, त्यात मनोज जरांगे पाटील यांच्या बाजूने पाच तर विरोधात पाच सदस्यांनी मतदान केलं. आपल्या मागण्या मान्य झाल्या नाही, तर विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभे करण्याचा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरु असून राज्यात मुंबईसह इतरत्र मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल आहे. काल कोकणात बऱ्याच ठिकाणी, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस

झाला. पुण्यात संध्याकाळी जोरदार पाऊस झाला.  सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज दुपारपासून पावसाची संततधार सुरु आहे. हवामान विभागाने जिल्ह्यात उद्याकरता रेड अलर्ट दिला आहे. रत्नागिरीतही संध्याकाळपासून संततधार सुरू होती.